स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com

---

**प्रेसनोट** दिनांक:- १८/०५/२०१८

## सुरगाण्यात अवैध मद्यसाठा जप्त - स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाचा छापा

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सा़ो** यांनी आदेशित केले प्रमाणे जिल्हयातील अवैध धंदयाचे समुळ उच्चाटन होणेसाठी अवैधरित्या मद्याची वाहतुक व विक्री करणारे, तसेच हातभट्टीची गावठी दारू तयार करणारे इसमांवर सत्वर कारवाई करण्यात येत आहे. त्यानुसार **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी स्थागुशाचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना अवैध धंदयांवर छापे टाकणेसाठी सुचना दिल्या आहे.

त्याप्रमाणे आज दिनांक १८/०५/२०१८ रोजी स्थागुशाचे पथक अवैध धंदयांवर कारवाई करणेसाठी सुरगाणा पोलीस ठाणे हद्दीत गस्त घालत होते. दरम्यान स्थागुशाचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांना मिळालेल्या गुप्त माहितीप्रमाणे, काही इसम हे उंबरठाण, ता.सुरगाणा परिसरात अवैधरित्या देशी विदेशी मद्याची विक्री व वाहतुक करतात बाबत समजले. त्याप्रमाणे स्थागुशाचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी उंबरठाण ते धरमपुर जाणारे रोडलगत असलेल्या एका गाळयात अचानक छापा टाकला, सदर ठिकाणी **इसम नामे जगन रामदास चौधरी,** वय २७, रा. उंबरठाण, ता.सुरगाणा, जि.नाशिक हा विनापरवाना बेकायदेशीररित्या दमन राज्यातील मद्यसाठा महाराष्ट्र राज्यात विक्रीस प्रतिबंध असतांना देखील विक्री करतांना मिळुन आला. सदर इसमाचे कब्जातुन जॉन मार्टीन कंपनीच्या १४४० सिलबंद बाटल्या, तसेच हायवर्ड कंपनीचे बियरचे ३३६ टिन **असा एकुण १ लाख ३२ हजार ७२० रू. किंमतीचा अवैध मद्यसाठा जप्त** करण्यात आला असुन त्याचेविरूध्द **सुरगाणा पोलीस ठाणेस महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(अ)(ई) ८१, ९० प्रमाणे गुन्हा दाखल** करण्यात आला आहे

मा. पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सा़ो यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे, पोउनि एम.एस.रणमाळे, सपोउनि रामभाउ मुंढे, जिवराज इलग, पोहवा हनुमंत महाले, दत्तात्रय साबळे, पोना वसंत खांडवी, पोकॉ विश्वनाथ काकड, राजु वायकंडे, संदिप लगड अशा पथकाने सदर कारवाई केली असुन जिल्हयातील अवैध धंदयांचे समुळ उच्चाटन होणेसाठी आगामी काळात अवैध धंदयांवर सतत कारवाई सुरू राहणार आहे.